महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती.
(मौजे मेडद, बारामती-मोरगाव रोड, ता.बारामती, जि.पुणे- ४१३१०२)
**Email ID - gacbaramati@gmail.com  Contact No. 02112 220759**

जा.क्र.शाआमबा/आस्था/कंत्राटी अध्यापक/जाहिरात/२१६३/२०२६,  दि.१५/०९/२०२६

## कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत.

**(Walk in Interview)**

संदर्भ :- १) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्र.एमईएस-१५०८/प्र.क्र.९४/०८/वैसेवा-१, दि.०७.०९.२०२१.
२) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्र.आयुसे-१०२१/प्र.क्र.१३०(भाग-१)/आयु-१, दि०४.११.२०२२.
३) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.आयुसे-०७२१/प्र.क्र.९७/आयु-१, दि.०७.११.२०२३.
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. आयुसे-१०२१/प्र.क्र.१३० (भाग-१)/९८६१७१/आयु-१, दिनांक १६ एप्रिल, २०२५.

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयांन्वये स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय बारामती, पुणे या महाविद्यालयासाठी आवश्यक असलेली अध्यापकीय पदे कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता विहीत अटीं व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छूक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (Walk in Interview) दि.२९.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात येत आहेत.

तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या सध्य:स्थितीत आवश्यक अध्यापक यांचे पदांचा विषय व तपशिल खालील प्रमाणे आहे.

| विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहायक प्राध्यापक | प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे | | | |
| क्रिया शारीर | ०१ | ०१ | - | दि.२९.०९.२०२६ सकाळी ११.०० वाजता |
| स्वस्थवृत्त | - | ०१ | - | |
| कायचिकित्सा | ०१ | ०१ | - | |
| पंचकर्म | ०१* | ०१ | - | |
| कौमारभृत्य | ०१ | - | - | |
| शल्यतंत्र | ०१ | - | - | |
| शालाक्यतंत्र | ०१ | ० | - | |
| स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र | - | - | ०१* | |
| एकुण रिक्त पदे | ०६ | ०४ | ०१ | |

* संभावित रिक्त होणारी पदे. (सद्य:स्थितीत या पदांवर कंत्राटी तत्वावर अध्यापक कार्यरत आहेत.)

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत /रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून /पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधीत विषयातील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ सहायक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या संबंधीत विषयातील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ सहायक प्राध्यापक पदासाठी करार पध्दतीवरील संबंधीत उमेदवाराचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ (Walk in Interview) | अधिष्ठाता, स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, द्वारा मौजे मेडद, बारामती-मोरगाव रोड, ता.बारामती, जि. पुणे-४१३१०२ |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्यांच्या वयाच्या ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिने सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील.) |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) संविधानीक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधन, निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>५) भा.चि.कें.प./भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक (Teacher code) सांकेतांक असणे आवश्यक आहे. |
| अनुभव | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान ०५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | :- | प्रतिमाह रु.१,५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवारांच्या उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पुर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिने सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहिल.) |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद /भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) संविधानिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधन, निबंध किंवा पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| | | प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>५) भा.चि.कें.प./भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक (Teacher code) सांकेतांक असणे आवश्यक आहे. |
| अनुभव | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण ०५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहायक प्राध्यापक पदाचा किमान ०३ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | :- | प्रतिमाह रु.१,२०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवारांच्या उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | सहायक प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिण्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील.) |
| शैक्षणिक अर्हता | :- | १. महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हता पैकी किंवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अन्वये, NCISM नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि<br>२. संविधानीक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३. ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| मानधन | :- | प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

## इतर अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिने कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहिल. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनःश्च करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. तथापि अशा प्रकारच्या पुनर्नियुक्त्या उमेदवाराने त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असणार नाहीत. |
| २ | सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस अन्यथा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. |
| ३ | नियुक्तीसाठी बाह्यशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| ४ | नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणेच उमेदवारास पदाची कर्तव्य आणि |

| | |
|---|---|
| | जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील व त्यांच्याप्रमाणेच कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती तसेच इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे उमेदवारास आवश्यक राहील. |
| ५ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ ०७ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. शासकीय सुट्ट्यांमध्ये गरजेप्रमाणे महाविद्यालयात किंवा रुग्णालयात सेवा देणे गरजेचे राहिल. सीएमई प्रशिक्षणाचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यांत येणार नाही. त्याकरीता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर सीएमई प्रशिक्षण कालावधीचे मानधन कपात करण्यांत येईल. |
| ६ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ०३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ०३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतरच नियुक्त उमेदवाराचा राजीनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| ७ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्याकडून नियमितपणे घेण्यांत येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक आढळल्यास संबंधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. तसेच कोणत्याही स्तरावर नियुक्ती रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. |
| ८ | कंत्राटी पध्दतीच्या नियुक्त उमेदवारास प्रस्थापित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा, व इतर अनुषंगीक कामकाज विभागातील वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली नेमूण दिलेली विवक्षित कामे व आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| ९ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहिल. तसेच त्यांना कार्यालयीन वेळेत वैद्यकिय व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. |
| १० | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत/ नियुक्ती आदेशात नमूद कालावधीत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे आवश्यक आहे. |
| ११ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व याबाबत न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्यांबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी/ सेवानिवृत्तीच्या लाभासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. |
| १२ | शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीचे तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र रु. ५००/- चा बॉन्ड पेपरवर (जाहिरातीतील परिशिष्ट ब व परिशिष्ट क) या कार्यालयाद्वारे नियुक्ती आदेश निर्गमित झाल्यानंतर रुजू होतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील. |
| १३ | शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी निश्चित होणारे पदासंबंधीच्या आवश्यकतेप्रमाणे बंधपत्र निवड झाल्यानंतर रुजू होते वेळी देणे बंधनकारक राहिल, तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील. |
| १४ | उमेदवार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवारांची निवड झाल्यास रुजू होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |
| १५ | उमेदवाराने वयाची ६५ वर्ष पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात येईल/ समाप्त करण्यात |

| | |
|---|---|
| | येईल. |
| १६ | सदर पदाचे कंत्राटी मानधन "१०- कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यांत येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| १७ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यांत येणार नाहीत. |
| १८ | उमेदवारांनी मुलाखतीस येताना आवश्यक असणारी सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे (Original Documents) व त्यांच्या ०२ स्वसाक्षांकीत प्रती (२ Self attested Xerox Set of Documents), तसेच अनुभव प्रमाणपत्र, मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. |
| १९ | निवड झालेल्या उमेदवारांची यादी स्व. अजित दादा पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांचे संकेतस्थळावर (www.gacbaramati.com) प्रकाशित करण्यांत येईल. |
| २० | सदर अध्यापकीय पदे ही कंत्राटी पध्दतीने भरावयाची असल्याने त्यासाठी कोणतेही आरक्षण लागू राहणार नाही. |
| २१ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| २२ | सहायक प्राध्यापक पदासाठी मुलाखत देणाऱ्या उमदवारांसाठी भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग (NCISM), नवी दिल्ली यांच्या नियमानुसार NTET Exam उत्तीर्ण होणे आवश्यक असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |

तरी सदर पदावर मुलाखतीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahayush.gov.in व www.gacbaramati.com या संकेतस्थळावरील जाहिरातीसोबत उपलब्ध करुन दिलेला विहित नमुन्यातील अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रांच्या दोन स्वसाक्षांकित प्रतींच्या संचासह (**2 Self attested Xerox Set of Documents**) अधिष्ठाता, स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, द्वारा मौजे मेडद, बारामती-मोरगाव रोड, ता.बारामती, जि. पुणे-४१३१०२ येथे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता दि.२९.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

सही/-
अधिष्ठाता,
स्व. अजित (दादा) पवार
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती.

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी. |
|---|

# परिशिष्ट ”अ”

## अर्जाचा नमुना

### महाराष्ट्र शासन

### स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती.

प्रति,
मा.अधिष्ठाता,
स्व. अजित (दादा) पवार
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती.

विषय :- आपल्या महाविद्यालयातील ................................. या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत.
संदर्भ :- आपली जाहिरात दिनांक ..............

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या माहविद्यालयातील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक .....................................(विषय) या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्याच्या कालावधीकरीता जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव (मराठीमध्ये) | : | आडनाव | स्वतःचे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| | | | | | |
| २) | नवीन अध्यापक सांकेतांक (NCISM TEACHER CODE) | : | | | |
| ३) | पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह | : | | | |
| ४) | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | |
| ५) | ई - मेल | : | | | |
| ६) | जन्मदिनांक | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय | : | वर्ष | महिने | दिवस |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९) | शैक्षणिक अर्हता : माध्यामिक/ उच्च माध्यमिक परीक्षा/ पदवी/ पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्राबाबत नमूद करावे तसेच शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला व सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट/ प्रमाणपत्र सोबत जोडाव्यात. | | | | |
| | अ.क्र. | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | बोर्डाचे/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
| | १. | एस.एस.सी (SSC) | | | |
| | २. | एच.एस.सी (HSC) | | | |
| | ३. | बी.ए.एम.एस. (BAMS) | | | |
| | ४. | एम.डी.(विषयः ) | | | |
| | ५. | पी.एच.डी. (Ph.D) | | | |
| | ६. | अन्य (Other) | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०) | अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.) | | | | |
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११) | कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राह्य धरला जाईल.) | | | | |
| | अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी (दि...ते दि...) (वर्ष/महिने/दिवस) | विद्यापीठ शिक्षक मान्यता होती काय, असल्यास विद्यापीठाचे पत्र जोडावे (पत्र क्र. व दिनांक) |
| | १ | | | | |
| | २ | | | | |
| | ३ | | | | |
| | ४ | | | | |
| | ५ | | | | |
| | ६ | | | | |
| | ७ | | | | |

| | |
|---|---|
| १२) | पदव्युत्तर शिक्षक आहात का ? असल्यास अनुभव ......वर्षे ....महिने.........दिवस |

| | | |
|---|---|---|
| १३ | Ph.D. मार्गदर्शक आहात का ? Ph.D. पदवी मिळालेल्या विदयार्थ्यांची संख्या............. | |
| १४) | प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात) | |
| १५) | प्रकाशित पुस्तकांचा तपशील : (पुस्तकाची स्वसांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात) | |
| १६) | पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात) | |
| १७) | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल (स्वसांक्षांकित प्रती) : | |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५ | |
| | ६ | |
| | ७ | |
| | ८ | |
| | ९ | |
| | १० | |
| | ११ | |
| | १२ | |
| | १३ | |
| | १४ | |
| | १५ | |
| | १६ | |
| | १७ | |
| | १८ | |
| | १९ | |
| | २० | |
| | २१ | |
| | २२ | |
| | २३ | |
| | २४ | |

टिप :- परिशिष्ट "ब" व "क" तील प्रतिज्ञापत्रे एकाच ५०० रुपयाचे बंधपत्रावर देण्यांत यावी.

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "ब"

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/ श्रीमती/ कुमारी ............................................. प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/ करते की, वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "**क**"

## शपथपत्र

मी श्री/ श्रीमती/ कुमारी ............................................................प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/ करते की, जाहिरातीत नमूद अटी व शर्तीचे पालन करुन, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करीन.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "**ड**"

## ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य/ वैद्या.......................................या महाविद्यालयात दिनांक ................पासून........................या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/ वैद्या.................. ................यांची स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती येथे प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य/ अधिष्ठाता |
|---|---|
| ............................ | ............................ |
| ............................ | ............................ |

ठिकाण :

दिनांक :

ठिकाण :

दिनांक :

# अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी (०२ संच)

## (स्वसाक्षांकित प्रमाणपत्राच्या सत्यप्रती)

| Sr.No. | Document Name | जोडले आहे/ नाही |
|---|---|---|
| ०१ | TC/LC/Birth/SSC Passing Certificate (for **age proof**) | |
| ०२ | **Domicile Certificate** of Maharashtra | |
| ०३ | **Nationality Certificate**/Leaving Certificate/ Passport | |
| ०४ | If fresher **NTET Exam Pass Certificate** | |
| ०५ | If Change in Name **Gazette or Marriage Certificate** | |
| ०६ | I/II/III/Final - BAMS **Marksheet** (Including Failed) | |
| ०७ | BAMS **passing Certificate** | |
| ०८ | **Internship Completion Certificate** (University) | |
| ०९ | BAMS **(UG) Degree Certificate** | |
| १० | MCIM /Central Council/ State- **Registration Certificate** | |
| ११ | MD/MS **(PG) Degree Certificate/** Passing Certificate | |
| १२ | All **Experience Certificates** (Required for Applied Post) MUHS/Other University Approval | |
| १३ | Ph.D. Degree/ Passing Certificate | |
| १४ | **MS-CIT** or Equivalent Qualification | |
| १५ | **N.O.C.** from Current Working Institute (if working) | |
| १६ | **Relieving Certificate** (If Resigned/ Relieved) | |
| १७ | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) | |
| १८ | Research Paper publication in National or International Peer reviewed index journal | |
| १९ | Proof of Text Book / Ref. Book/chapter written in any other book approved by university | |
| २० | Participation in National/International CME / Conference / Seminar/Paper presentation etc. | |
| २१ | Keynote address/Chairman/Chairperson in National/International Seminars/Conferences | |
| २२ | **Aadhar Card** | |
| २३ | **Pan Card** | |
| २४ | If Any Other Additional Certificate/Document | |
| २५ | If Any Other Additional Certificate/Document | |
| २६ | If Any Other Additional Certificate/Document | |
| २७ | If Any Other Additional Certificate/Document | |
| २८ | If Any Other Additional Certificate/Document | |

टिप :- उपरोक्त नमूद कागदपत्रांचे दोन स्वसाक्षांकित प्रतींचे संच (२ Self attested Xerox Set of abave Documents) सोबत आणणे बंधनकारक आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)